# Application Form of "AAI" Scheme

PHOTO
SIGN

| SR. NO. | PARTICULERS | DETAILS |
|---|---|---|
| 1 | Business Name : | |
| 2 | Type Of Organisation | ☐ Sole Proprietor<br>☐ Partnership<br>☐ Co-Op. Society<br>☐ LLP<br>☐ Private Ltd / Public Ltd<br>☐ SHG (Self Help Group) |
| 3 | Applicant's Name : | |
| 4 | Gender : | ☐ Ma ☐ Female |
| 5 | Applicant's Date Of Birth : | D D M M Y Y Y Y Age : |
| 6 | E-mail ID : | |
| 7 | Mobile No:<br>( Aadhar Link ) | |
| 8 | Landline No : | |
| 9 | Residencial Address : | |
| 10 | Business Address : | |

| | | |
|---|---|---|
| 11 | **Business Type / Name in Tourism Sector :** | • Caravan, Beach Shack, Adventure Tourism (Land, Air, Water) Tourist Facilitation Centre, Agriculture Tourist Center, Home Stay, Bed & Breakfast, Resort, Hotel, Motel, House Boat, Tent, Tree House, Hotel, Vocational House, Tourist Villa, Wooden Cottages, Pods etc.<br>• Restaurant, cafeteria, fast food, common kitchen, café, Bakery etc.<br>• Tour operators, travel agents, tour guides, cruises, tour and travel agencies, art and Craft Village, Tourist Transporters Operator etc.<br>• Projects related to tribal / nature tourism, medical tourism, wellness Center, Ayurveda, Yoga Center etc.<br>• Other tourism business.<br>e.g. Souvenir Shops, Event Management & Verious Food Vendors etc. |
| | | Business Name : |
| 12 | **Aadhar Card No :** | |
| 13 | **PAN Card No :** | |
| 14 | **PAN Card No :**<br>**( Company / LLP / Scociety/ Firm ) If Available** | |
| 15 | **Caste :** | ☐ (SC) ☐ (ST) ☐ (NT) ☐ (OBC)<br>☐ (GEN) |
| 16 | **Udyog Aadhar :**<br>**(If Available)** | ☐ YES **Aadhar No.**<br>☐ NO |
| 17 | **GST No :**<br>**(If Available)** | |
| 18 | **No.of Female Employees In Business:** | |
| 19 | **Total No. of Employees:** | |
| 20 | **Total Project Cost :**<br>**(excluding cost of land)** | |

| | | |
|---|---|---|
| 21 | **Information Of Project:** **(Minimum 500 words)** | |
| 22 | **Bank Details :** | |
| | **Account Holder Name :** | |
| | **Account No :** | |
| | **Type Of Account :** | |
| | **Bank Name :** | |
| | **IFSC Code :** | |
| 23 | **Whether the Business is in Operation or Not :** **(If Yes, Since when? / If Not, When will it start? )** | ☐ YES ☐ NO |
| | | |

**Declaration :**

1) I / We agree to follow the terms and conditions of " AAI " Tourism Policy.
2) If any of the above information find false / incorrect, I / We will be personally responsible for cancellation of Letter Of Intent under " AAI " Policy.
3) I understand that in case of delay in repayment of loan installments, the interest amount will not be reimbursed.
4) It is mandatory for me to submit the following documents for Interest Reimbursement :
   - Loan Sanction Letter.
   - Loan Account Statement.
   - EMI Scheduled.
   - Saving Account Cheque.

**Applicant's Signature**

**Date :**
**Place :**

"आई" महिला केंद्रित / लिंग समावेशक
(Gender Inclusive) पर्यटन धोरण.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
**शासन निर्णय क्रमांक : टिडीएस २०२२/१२/ प्र.क्र.७५०/पर्यटन,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १९ जून, २०२३.

------------------

**प्रस्तावना :-**

पर्यटन हे सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. त्यामुळे महिलांचा पर्यटन क्षेत्रातील सहभाग त्यांच्या आर्थिक विकासाकरीता एक चांगले साधन ठरु शकते. पर्यटन क्षेत्रात महिलांमध्ये उद्योजकता आणि नेतृत्व गुण विकसित करण्याच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला केंद्रित / लिंग समावेशक पर्यटन धोरण जाहीर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. **महिलांसाठी पर्यटन धोरणाची पंचसूत्री :-** राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने महिला केंद्रित / लिंग समावेशक पर्यटन धोरण आखण्यात आले असून सदर धोरणाची पंचसुत्री खालीलप्रमाणे आहे :-

१. महिला उद्योजकता विकास.
२. महिलांकरीता पायाभुत सुविधा.
३. महिला पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे.
४. महिला पर्यटकांसाठी कस्टमाईज्ड उत्पादने/सवलती.
५. प्रवास आणि पर्यटन विकास.

२. **कार्यदलाचे (Task Force) गठन :-** या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करणे, उपाययोजना सुचविणे व संनियंत्रण करण्यासाठी एक कार्यदल (Task Force) गठीत करण्यात येत असून कार्यदलाची रचना खालीलप्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| १. | मा.मंत्री (पर्यटन) | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव ( नियोजन ) | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव / सचिव ( व्यय ), वित्त विभाग. | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव ( पर्यटन ) | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव / सचिव, महिला व बाल विकास | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव / सचिव, कौशल्य व रोजगार विकास | सदस्य |
| ७. | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | सदस्य |
| ८. | संचालक, पर्यटन संचालनालय | सदस्य सचिव |

३. अंमलबजावणी यंत्रणा :- या पंचसूत्रीनुसार हे धोरण पर्यटन संचालनालय व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्यामार्फत सर्व संबंधित विभागांच्या सहकार्याने राबविण्यात येईल. हे धोरण राज्याच्या पर्यटन धोरणाचा अविभाज्य भाग असेल आणि वार्षिक कृती आराखड्याच्या आधारे त्याची अंमलबजावणी केली जाईल.

४. पर्यटन विभागामार्फत देण्यात येणारी प्रोत्साहने व सवलती :-

अ) पर्यटन संचालनालयामार्फत प्रोत्साहने व सवलती :-

१. पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजकांचा सहभाग वाढविण्यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यामधील पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत महिलांच्या मालकीच्या व त्यांनी चालविलेल्या १० पर्यटन व्यवसायांना (होमस्टे, हॉटेल / रेस्टॉरंट, टूर अॅन्ड ट्रॅव्हल एजन्सी इ.) पर्यटन व्यवसाय उभारणीसाठी मान्यताप्राप्त बँकांमार्फत घेतलेल्या रु.१५ लाख पर्यंतच्या कर्जाच्या रक्कमेवरील व्याजाची रक्कम १२% च्या मर्यादेत, त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात, पूर्ण कर्ज परतफेड होईपर्यंत किंवा ०७ वर्षे कालावधीपर्यंत किंवा व्याजाची रक्कम रु.४.५ लक्षच्या मर्यादेपर्यंत, या तीन पर्यायांपैकी जे आधी घडेल तोपर्यंत, दरमहा खालील अटींच्या अधीन राहून जमा करण्यात येईल :-
   - अ) पर्यटन व्यवसाय पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत असला पाहिजे.
   - ब) पर्यटन व्यवसाय महिलांच्या मालकीच्या व त्यांनी चालविलेल्या असला पाहिजेत.
   - क) महिलांच्या मालकीच्या हॉटेल / रेस्टॉरंट्समध्ये ५०% व्यवस्थापकीय व इतर कर्मचारी महिला असणे आवश्यक राहील.
   - ड) महिलांच्या मालकीच्या टूर आणि ट्रॅव्हल्स एजन्सी मध्ये ५०% कर्मचारी महिला असणे आवश्यक राहील.
   - इ) पर्यटन व्यवसायाकरीता आवश्यक सर्व परवानग्या प्राप्त असाव्यात.
   - ई) कर्जाचे हप्ते वेळेत भरले पाहिजेत.

२. पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत पर्यटन व्यवसायामध्ये कार्यरत असलेल्या महिला सहल मार्गदर्शक, महिला वाहन चालक, महिला सहल संचालक (टूर ऑपरेटर) व इतर महिला कर्मचारी यांना केंद्र / राज्य शासनाच्या विमा योजनेमध्ये सहभागी करुन त्यांचा वार्षिक विमा हप्ता पहिली ०५ वर्षे शासनामार्फत भरण्यात येईल.

ब) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत प्रोत्साहने व सवलती :-

१. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे औरंगाबाद येथील पर्यटक निवास, राज्यातील प्रथम पूर्णत: महिला संचालित पर्यटक निवास म्हणून व खारघर रेसिडेन्सीचे "अर्का रेस्टॉरंट" पूर्णत: महिला संचालित रेस्टॉरंट म्हणून चालविण्यात येईल.

२. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या टूर ऑपरेटरमार्फत आयोजित पर्यटन सर्किट / पॅकेजेस मध्ये महिला पर्यटकांना २०% सूट देण्यात येईल. या २०% सवलतीची रक्कम महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाद्वारे टूर ऑपरेटरला दिली जाईल. याकरीता होणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास शासनाकडून करण्यात येईल.

३. सर्व महिला पर्यटकांना, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सर्व रिसॉर्टस/युनिट्स मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ०१ ते ०८ मार्च या कालावधीत तसेच, वर्षभरात इतर २२ दिवस अशाप्रकारे एकूण ३० दिवस, फक्त ऑनलाईन बुकींगमध्ये ५०% सूट देण्यात येईल.

४. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालमत्तांच्या ठिकाणी, महिला बचत गटांना हस्तकला, कलाकृती, प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ इत्यादींच्या विक्रीसाठी स्टॉल / जागा उपलब्ध करुन देण्यात येईल.

५. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या रिसॉर्टस मध्ये महिला पर्यटकांसाठी विशेष सुविधा:-

- अपंग किंवा वृध्द महिलांकरीता लिफ्ट जवळच्या खोल्या उपलब्ध करुन देण्यास प्राधान्य.
- महिलांसाठी विशेष खेळ, मनोरंजन कार्यक्रमांचे आयोजन.
- ५ वर्षांपर्यंतची मुले असलेल्या महिला पर्यटकांसाठी पाळणाघर.

६. महिला पर्यटकांच्या विविध गटांसाठी अनुभवात्मक टूर पॅकेजेस :-

- ज्येष्ठ महिला नागरिकांसाठी सहल.
- दिव्यांग महिलांसाठी विशेष सहल (शारीरिक आणि मानसिक अपंग दोन्ही).
- महिला पर्यटकांसाठी एक दिवसीय सहल आणि शहर सहली.
- महिलांसाठी साहसी सहली आणि ट्रेकींग टूर्सचे आयोजन.

५. महिला केंद्रित पर्यटन धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता पर्यटन संचालनालयामध्ये महिला पर्यटन धोरण कक्ष स्थापन करण्यात येईल. या कक्षाकरीता बाह्यस्त्रोत यंत्रणेच्या माध्यमातून ०६ प्रकल्प अधिकारी व ०६ डाटा एंट्री ऑपरेटर इतके मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यास व त्यावरील खर्चासाठी योजनेवर होणाऱ्या खर्चाच्या ०४% निधी वापरण्यात येईल.

६. महिलांना पर्यटन क्षेत्रामध्ये व्यवसाय व रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी तयार करण्यात आलेल्या "आई" या महिला केंद्रित / लिंग समावेशक पर्यटन धोरण राबविण्यासाठी वार्षिक कृती आराखडा निश्चित करुन त्याकरीता स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करुन विभागाकडे उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतूदीमधून पुर्नविनियोजनाव्दारे आवश्यक वित्तीय तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या http://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०६१९१६४४०१३३२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(राधिका रस्तोगी)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. मंत्री(पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
मा. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
मा. विरोधी पक्षनेता विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
मा. विरोधी पक्षनेता विधानसभा, विधानभवन, मुंबई.
मा. सर्व विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
मा. सर्व विधानसभा सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग
निवड नस्ती, कार्यासन-पर्यटन.

****

# <u>दस्तऐवज आणि मार्गदर्शक सूचना</u>

'आई' पर्यटन धोरणांतर्गत व्याज परतावा मिळविण्यासाठी अर्ज दाखल करण्याबाबतच्या सूचना.

१) नवीन पर्यटन प्रकल्प उभारण्यासाठी किंवा जुना पर्यटन प्रकल्प वाढीकरिता विहित नमुन्यातील अर्ज करता येईल.

२) अर्ज करण्याकरीता : उपसंचालक पर्यटन, पर्यटन संचालनालय, प्रादेशिक कार्यालय - नवी मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर संबंधित कार्यालयाकडे अर्ज सादर करावा.

३) खालील कागदपत्रे स्वसाक्षांकित करून अर्जासोबत जोडावे.

अ. आधार कार्ड / पासपोर्ट / ड्रायव्हिंग लायसन्स / मतदार ओळखपत्र.

ब. उद्योग नोंदणी प्रमाणपत्र / वीज बिल / दूरध्वनी बिल / महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र.

क. सदर व्यवसाय महिलांच्या मालकी हक्काचा असल्याचे दर्शविणारे प्रतिज्ञापत्र १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर रीतसर नोटरीकरून अर्जासोबत जोडावे.

ड. पॅन कार्ड प्रत.

इ. अन्न व औषध प्रशासन परवाना. (खादय व्यवसायासाठी अनिवार्य)

ई. जीएसटी क्रमांक. (आवश्यकतेनुसार)

फ. रद्द केलेला चेक.

ग. प्रकल्प संकल्पना. (५०० शब्दांत)

ज. <u>www.gras.mahakosh.gov.in</u> या लिंकवर रु. ५० ऑनलाइन प्रक्रिया शुल्क भरून चलनाची प्रत अर्जासोबत जोडावी.

ह. <u>www.nidhi.tourism.gov.in</u> या संकेतस्थळावरील नोंदणी केली असल्यास त्याची प्रत अर्जासोबत जोडावी.

# मार्गदर्शक सूचना

१. **उद्देश :**

महिलांनी पर्यटन क्षेत्रात व्यवसाय करण्याकरीता अधिकृत बँकांकडून १५ लाखाच्या मर्यादेत कर्ज घेतले असेल तर त्या कर्जावरील व्याजाचा परतावा हा बँक प्रमाणिकानुसार पर्यटन संचालनालयाकडून देण्यात येईल.

२. **आर्थिक सहाय्य :**

महिला उद्योजकांना पर्यटन व्यवसायाकरीता अधिकृत बँकांकडून रु. १५ लाखाच्या मर्यादेत कर्ज मंजूर केले असल्यास त्यावरील व्याजाचा परतावा (१२%च्या मर्यादेत) रू.४.५० लाख किंवा ७ वर्ष कालावधीकरीता यापैकी जे आधी घडेल ते पर्यटन संचलनालयाकडून व्याजाचा परतावा म्हणून अदा करण्यात येईल.

३. **व्यवसायाचे प्रकार आणि क्षेत्र:**

१. पर्यटन व्यवसाय क्षेत्र महाराष्ट्र राज्यातील असावे.

२. व्यवसायाचा प्रकार.

अ) कॅरॅव्हॅन, बिच शॅक, साहसी पर्यटन (जमीन,हवा,जल) पर्यटक सुविधा केंद्र, कृषी पर्यटन केंद्र, होम स्टे, निवास व न्याहारी, रिसॉर्ट, हॉटेल, मोटेल, हाऊस बोट, टेंट, ट्री हाऊस, हॉटेल, व्होकेशनल हाऊस, पर्यटन व्हिला, वूडन कॉटेजेस, पॉडस, महाभ्रमण इ.

ब) रेस्टॉरंट, उपहारगृह, फास्ट फुड, महिला चलित कॉमन किचन, कॅफे, बेकरी.

क) टुर ऑपरेटर, ट्रॅव्हल एजंट, टुर मार्गदर्शक, क्रुज, टुर अँड ट्रॅव्हल एजंसी, आर्ट अँड क्राफ्ट व्हिलेज, टुरिस्ट ट्रांस्पोटर्स ऑपरेटर, हाऊस बोट.

ड) आदिवासी / निसर्ग पर्यटनाशी संबंधित प्रकल्प, मेडीकल पर्यटन, वेलनेस सेंटर, आयुर्वेदा योगा केंद्र इ.

इ) इतर पर्यटन व्यवसाय (पर्यटकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या फायदेशीर ठरणारे) उदा. सोव्हिनिअर शॉप, विविध खाद्य पदार्थ विक्रेते, इव्हेंट मॅनेजमेंट, इ.

४. **<u>लाभार्थी अटी व शर्ती</u>** :

अ. महिला अर्जदार महाराष्ट्र राज्याची रहिवासी असावी.

ब. लाभार्थ्यांचे बँक खाते आधार लिंक असावे.

क.पर्यटन व्यवसाय महिलेच्या मालकीचा व त्यांनी चालविलेला असावा.

ड. पर्यटन व्यवसायात ५०% व्यवस्थापकीय मालकी व इतर कर्मचारी महिला असणे आवश्यक आहे.

इ. बँकेने कर्ज देताना अर्जदाराकडे कोणतेही तारण नसल्यास केंद्र शासनाच्या क्रेडिट गॅरंटी स्कीममध्ये समाविष्ट करून घ्यावे.

ई. महिला अर्जदारांनी विहित नमुन्यात ऑफलाईन किंवा ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर केल्यानंतर त्यांना पर्यटन संचालनालयाकडून पात्रता प्रमाणपत्र (Letter of Intent) दिले जाईल. सदर पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे त्यांनी अधिकृत बँकेकडून कर्ज मंजूर करून घ्यावे.

फ. कर्जाची परतफेड नियमित होणे आवश्यक आहे.

ग. व्यवसाय सुरू असल्याचे फोटो सादर करणे अनिवार्य आहे.

ह. व्याज रकमेव्यतिरिक्त इतर कोणतीही Bank Fees किंवा Charges पर्यटन संचालनालयाकडून अदा केले जाणार नाहीत.

-----------------------------------------***********-----------------------------------------

# Guidelines and Documentation for “AAI” Policy

**Instructions for filing application for interest refund under “AAI” Tourism Policy :**

1) An application in the prescribed format can be made for setting up a new tourism project or for expansion of an existing tourism project.

2**) Apply Application to Deputy Director (Tourism) :** Directorate of Tourism, Regional Office – Navi Mumbai, Pune, Nashik, Chhatrapati Sambhajinagar, Amravati and Nagpur.

**3) Following self attested documents attached with the application :**

- **a.** Aadhaar Card / Passport / Driving License / Voter ID Card.
- **b.** Business Registration Certificate / Electricity Bill / Telephone Bill / Maharashtra Shops and Establishment Certificate of Registration.
- **c.** An affidavit stating that the said business is a woman-owned business should be duly notarized on Rs.100/- stamp paper and attached with the application.
- **d.** PAN card copy.
- **e.** Food and Drug Administration license. (Compulsory for Food Business)
- **f.** GST No. (as required)
- **h.** A cancelled cheque.
- **i.** Project concept. (in 500 words)
- **j.** Pay application fees of Rs. 50/- on www.gras.mahakosh.gov.in , copy of challan should attach with application.
- **k.** If applicant registered on www.nidhi.tourism.gov.in , attach copy of registration.

## 1. Purpose :

If women have taken a loan up to the limit of Rs.15 lakhs from the authorized banks for doing business in the tourism sector, the reimbursement of the interest on that loan will be given by the Directorate of Tourism as per bank norms.

## 2. Financial Assistance :

Women entrepreneurs in tourism business taken a loan of Rs. 15 Lacs from authorized banks, the interest reimbursement (within the limit of 12%) or Rs.4.50

lacs or for the period of 7 years whichever is earlier will be paid as a Interest Reimbursement by the Directorate of Tourism.

## 3. Types and Areas of Business:

1. Tourism business should be within Maharashtra State.

**2. Type of business :**

**a)** Caravan, Beach Shack, Adventure Tourism (Land, Air, Water) Tourist Facilitation Centre, Agri Tourism Center, Home Stay, Bed & Breakfast, Resort, Hotel, Motel, House Boat, Tent, Tree House, Hotels, Vocational Rental Houses, Tourist Villas, Wooden Cottages, Pods etc.

**b)** Restaurant, cafeteria, fast food, women's run common kitchen cafe, bakery.

**c)** Tour Operators, Travel Agents, Tour Guides, Cruises, Tour & Travel Agencies, Art & Craft Village, Tourist Transporters Operator, House Boat.

**d)** Projects related to tribal / nature tourism, medical tourism, wellness centers, Ayurveda, Yoga Center etc.

**e)** Other tourism businesses (directly or indirectly useful for tourists) **e.g.** Souvenir Shop, Various Food Vendors, Event Management, etc.

## 4. Beneficiary Terms and Conditions :

**a.** Woman applicant should be a resident of Maharashtra state.

**b.** Beneficiary's bank account should be Aadhaar linked**.**

**c.** The tourism business should be owned and operated by women.

**d.** Tourism businesses must have 50% managerial ownership and other employees should be women.

**e.** If the applicant does not have any collateral while granting the loan, the bank may include it in the credit guarantee scheme.

**f.** After submitting the application in the prescribed format offline or online, the women applicants are given the Eligibility Certificate (Letter of Intent) by the Directorate of Tourism.On the basis of the said eligibility certificate, applicant get the loan sanction from the authorized bank.

**g.** Loan repayment must be regular.

**h.** Submission of photo of Tourism Project / business is mandatory.

**i.** Apart from the interest amount, other bank fees or charges will not be reimbursed by the Directorate of Tourism.

-----------------------------------------------XOXOXOX----------------------------------------------